जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/०८/२०२३
## दि.०५/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ६३५/२०२३,भादविक ३२६,३२४,३२३,५०४,५०६,३४, आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | आदेश गायकवाड,वय २१ वर्ष,रा.रानमळा,कोलवडी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०८/२०२३ रोजी २२/३० वा.पेट्रोल पंपाचे मागे,पाटील वस्ती,ता.हवेली,जि.पुणे येथील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र अनिकेत हरगुडे, धनंजय उंद्रे यांचेसह कारमधुन गौरव ढमाले यांस भेटण्यासाठी गेले असताना,अनिकेत याने नमुद इसमास तु माझी सहकारी हिस मेसेज करून फोनवर बोलु नको असे समजावुन सांगत असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादीस धक्का देऊन खाली पाडुन,त्यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने हातातील लोखंडी हत्याराने त्यांचे डोक्यावर,उजवे व डाव्या हाताचे पंजावर मारून,त्यांना गंभीर दुखापत केली. तसेच भांडणे सोडविणारे अनिकेत हरगुडे यास काठीने मारहाण करून,धनंजय उंद्रे यास उलटा कोयत्याने कानाचेवरती मारून दुखापत करून,फिर्यादीस शिवीगाळ करून, जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, गजानन जाधव ९८२२७४२३३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे २६३/२०२३,भादविक ३२४,३२३,४२७,५०४,५०६,१४३.१४७,१४९ |
| **फिर्यादी** | निखिल मेदनकर,वय-३२ वर्षे,रा.५८२ बाईफ रोड,वाघोंली,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर सहा साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०८/२०२३ रोजी रात्री ०१/३० वा.मुंढवा-कोरगोव पार्क रोडवरील वॉटर्स बार ॲण्ड किचन या हॉटेल मध्ये |
| **तपशिल** | यातील फियादी हे इव्हेंट मॅनेजमेंटचे काम करीत असुन,काही हॉटेल्स मध्ये ते वेग-वेगळे इव्हेंट ऑर्गनाईज करण्याचे काम करतात. फिर्यादी यांनी दिनांक ०५/०८/२०२३ रोजी मुंढवा-कोरेगाव पार्क रोडवरील वॉटर्स हॉटेल ॲण्ड बार किचन या हॉटेल मध्ये कव्वालीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्या ठिकाणी हॉटेलची पार्टी चालु असताना,त्यावेळी फिर्यादी तेथे हजर असताना,हॉटेल मालकाने नमुद हॉटेल बंद करण्याची वेळ झाल्याने त्यांचे हॉटेल बंद करीत असताना,त्याचा राग यातील नमुद इसमास आल्याने त्याने जोर-जोरात ओरडुन, गोंधळ घालुन,त्याचे इतर साथीदार यांना सदर ठिकाणी बोलावुन घेवुन,त्या सर्वांनी हॉटेल मधील सामानाची तोडफोड करुन,तसेच मुळ मालक व त्यांचा मावस भाऊ यांना शिवीगाळ करून,धमकी दिली. तसेच हॉटेलचे बाऊंसर यांना मारहाण करून,नमुद हॉटेलचे गि-हाईक इसम व महिला यांना तेथील खुर्च्याने व हाताने मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, आर.व्ही.महानोर ९९२३४०६०९७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १६४/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५० वर्षे,रा.शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपीत** | कारवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०७/२०२३ रोजी सकाळी ०७/०० वा.ते रात्रौ २४/३० वा.११८१,बाबासाहेब प्रधान रोड, शिवाजीनगर,पुणे ते कोल्हापुर ते पुणे प्रवासा दरम्यान कारमधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे आईसह त्यांचे राहते घर ११८१,बाबासाहेब प्रधान रोड, शिवाजीनगर,पुणे ते कोल्हापुर त्यानंतर पुन्हा त्यांचे राहते घरी असा प्रवास करीत असताना, सदर प्रवासा दरम्यान त्यांनी कार मध्ये ठेवलेल्या हॅन्डबॅग मधुन त्यांचे सोन्याचे दागिने असा एकुण ७५,०००/- रु किचा ऐवज सदर कारचालक यांनी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, बाजीराव नाईक |

## <u>दि.०६/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २७५/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९,महा.पो.का.क.३७(१) १३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | सुलतान शेख,वय २७ वर्षे,रा.लोहीयानगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर १० साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०८/२०२३ रोजी रात्री ००/०० वा. टिंबर मार्केट मध्ये डॉ.बाबा आढाव यांचे ऑफीस जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दिनांक ०५/०८/२०२३ रोजी रात्रौ ११/०० वा.जेवण करून,नमुद ठिकाणी त्यांचे मित्र १.अकबर खान २.अलिश शेख व इतरांसह गप्पा मारत उभे असताना,रात्री १२/०० वा.सुमारास अचानक यातील नमुद इसमांनी मोटार सायकलवरुन फिर्यादी यांचे जवळ येवुन,नमुद इसमाने फिर्यादीस तु माझ्या भावाला का मारले,आता यांना जिवंत ठेवायचे नाही,आज यांचा निकालच लावायचा असे म्हणुन,त्यांच्या हातातील कोयत्याने फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,त्यांचे डोक्याच्या पाठीमागील बाजुस,त्यांचे छातीच्या डावे बरगडीवर व डाव्या खांद्याच्या खाली पाठीवर वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचवेळी फिर्यादी यांचा मित्र अलिश शेख याचे डावे हाताच्या पंजावर,अकबर खान याच्या डावे हाताच्या पंजावर कोयत्याने वार करुन जखमी केले. त्यानंतर सर्वांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादी व त्यांचे मित्रांना शिवीगाळ व लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आकाश विटे ९९६०९६१०१३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २३४/२०२३,भादविक ३०७,३२६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,५०६,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन मुलगा,वय-१७ वर्षे,रा.पानमळा वसाहत,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | चार इसम व त्यांचे इतर साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०८/२०२३ रोजी रात्रौ १०/०० वा.सिंहगड रोडवरील कॉसमॉस बँकेच्या बाहेरील रिक्षा स्टॅण्ड जवळ,पानमळा वसाहत,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सिंहगड रोडवरील कॉसमॉस बँकेच्या बाहेरील रिक्षा स्टॅण्डवरील एका रिक्षा मध्ये बसले असताना,पानमळा वसाहत येथील त्यांचे ओळखीचे चार इसम व त्यांचे इतर साथीदार यांनी नमुद ठिकाणी येवुन,त्यांचेकडील टोच्या व धारदार हत्याराने फिर्यादीस जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचेवर वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.टी.जगदाळे ८१०८८००८४० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**